Impact Factor 6.625 E-ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue – 318 (B) April - 2023

## Dr. Babasaheb Ambedkar's Relevance to Inclusive Development in Contemporary India



**EDITORIAL BOARD**

**Guest Editor of the Issue :**
**Dr. Pramod Herode,**
**Principal,**
**Dr. Ambedkar College of Law, Nagsenvana**
**Aurangabad, Maharashtra .**

**Executive Editors of the Issue:**
**Dr. Gatha G. Nerlikar**
**Mr. Naresh W. Patil**
**Dr. Shilparani Dongre**

**Chief Editor :**
**Dr. Dhanraj T. Dhangar**

For Details Visit To : www.researchjourney.net SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 26. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : भारतीय थोर समाजसुधारक | प्रा. बनसोडे सुवर्णा |
| 27. | महिला सक्षमीकरणात भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | डॉ. जयश्री चव्हाण |
| 28. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर - महान राष्ट्रनिर्माता | प्रा. गणेश मोरे |
| 29. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थशास्त्रावरील विचार | अनिल पठाडे |
| 30. | राष्ट्रीय निर्माण प्रक्रियेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अतुलनीय योगदान | डॉ. श्रीराम भालेराव |
| 31. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संगीत | प्रा. नाना जाधव |
| 32. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची सद्यस्थितीतील उपयुक्तता | डॉ. साधना पाटील |
| 33. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : बुद्धिवाद आणि लोकशाही मूल्ये | डॉ. वर्षा बी. पाटील |
| 34. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही आणि घटनावादासंबंधीचे विचार | प्रा. अमोल गाडे |
| 35. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सक्षमीकरण | डॉ. मंगला कडव |
| 36. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर,बौद्ध धर्म व ललित कलेतील त्यांचे संगीतातील स्थान | प्रा.शरद गजभिये |
| 37. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणातील योगदान | प्रा.संध्या पा.फटिंग |
| 38. | भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | कल्पना डवले |
| 39. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि सद्यस्थिती | डॉ. सीमा सैंदाणे |
| 40. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणात योगदान | डॉ. पौर्णिमा गंथडे |
| 41. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक आणि राजकीय विचार | डॉ. राज चव्हाण, प्रा. सोनिया चव्हाण |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the pa on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the p rs responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can repu these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

Scanned with OKEN Scanner

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर,बौद्ध धर्म व ललित कलेतील त्यांचे संगीतातील स्थान

**प्रा.शरद पुडलिक गजभिये**
संगीत विभाग
डॉ.एल.डी.वलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स,
पवनी जिल्हा भंडारा

**प्रस्तावना:-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करण्यासोबतच त्यांच्या भविष्याविषयी सखोल चिंतन केले आहे विषमता रहित नवीन भारत निर्मितीच्या हेतूने स्वतः वर्षानुवर्षे चिंतन आणि सघंर्ष करत राहिले 1947 भारताच्या स्वातंत्र्यानंतर संविधान सभेमध्ये डॉक्टर आंबेडकर यांना संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवडून एक ऐतिहासिक पाऊल उचलले संविधानाच्या माध्यमातून भारतीयांसाठी एक मनुष्य एक मूल्य आणि एक मत हे तत्व अपणाहून भारत देश राजनैतिक दृष्टीने समानतेस पात्र झाला. स्वतंत्रता, समता व बंधुतेवर आधारित नव समाज कार्यकर्ता पुढे आला. परंतु देशाच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात हे तत्व लागू झाले नव्हते याकरता 29 नोव्हेंबर 1949 मध्ये भारतीय संविधान सभेमध्ये संविधान पारित होतेवेळी त्यांनी राष्ट्राला चेतावणी दिली होती. 26 जानेवारी 1950 आम्ही राजनैतिक जीवनात समान होऊ पण सामाजिक आर्थिक जीवनात असमान राहू आपण ही विषमता लवकरात लवकर हटविली पाहिजे. नाहीतर विषमतेचे शिकार झालेले लोक राजनैतिक प्रजातंत्राचा ढाचा उपटून फेकून देतील.

समाजाचे नियमन केवळ कायद्यानेच नाही तर त्याकरिता नैतिकतेचेही गरज आहे. नैतिकतेवर आधारित धर्माची, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे योग्य गंभीर जगतात त्यामुळे ते म्हणतात नवीन जगाला हे लक्षात राहिले पाहिजे की नवीन जग आणि पुराने जग हे भिन्न आहे जर कोणत्या धर्माला स्वीकारायचेच असेल. कारण नवीन जगाला पुराण्या जगाच्या तुलनेत धर्माची अत्याधिक आवश्यकता आहे. आणि तो बुद्ध धर्मच असू शकतो.

बाबासाहेब म्हणतात वर्ण व्यवस्था वर आधारित विषमताग्रस्त समाजाला समता युक्त समाज निर्माण करण्याकरता बौद्ध धर्म शिवाय दुसरा मार्ग नाही म्हणून हा बौद्ध धर्म आधुनिक जगात लागूकरण्याकरता त्यांनी तीन गोष्टी सांगितल्या.

**उद्दिष्टे:-**

- डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, बौद्ध धर्म आणि ललित कला याच्याशी कसा संबंध आहे हे दाखविणे
- बाबासाहेबांना उपजतच ललित कलेची कशी आवड होती हे दर्शविणे
- बौद्ध धम्म चित्रकला, शिल्पकला, काव्य कला, संगीत कला याला कसा महत्त्व देतो हे जगासमोर दाखवून देणे
- बौद्ध धम्माकडे लोकांना किंवा जगाला पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल घडवून आणणे.
- ललित कलेमध्ये संगीत जे गायन, वादन, नृत्य, मिळून बनलेले आहे याला बौद्ध धर्म आणि बाबासाहेब कसे महत्व देतात हे सांगणे.



Scanned with OKEN Scanner